ePaper
इराणवर पुन्हा लष्करी हल्ला करावा लागू शकतो, डोनाल्ड ट्रम्प यांचे संकेत

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™




पिंपरीमध्ये इंधन टंचाईची भीती; पेट्रोल पंप अचानक बंद

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 20 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## इराणच्या संसदेत चर्चा असल्याचा ब्रिटिश मीडियाचा दावा

# ट्रम्प-नेतन्याहूंना मारणाऱ्याला 560 कोटीचे बक्षीस

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**मध्यपूर्वेत वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर DONALD TRUMP, BENJAMIN NETANYAHU आणि इराण यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होत असल्याचे चित्र आहे. इराणचे सर्वोच्च नेते ALI KHAMENEI यांच्या निधनानंतर परिस्थिती अधिकच चिघळली असून, इराणच्या संसदेत एक अत्यंत वादग्रस्त विधेयक चर्चेसाठी आणले जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.**

ब्रिटीश माध्यम THE TELEGRAPH आणि THE JEWISH CHRONICLE यांच्या अहवालानुसार, इराणच्या राष्ट्रीय सुरक्षा आयोगाचे अध्यक्ष EBRAHIM AZIZI यांनी दिलेल्या माहितीनुसार हे विधेयक तयार करण्यात आले आहे. या प्रस्तावानुसार, डोनाल्ड ट्रम्प यांना ठार मारणाऱ्या व्यक्तीला 50 मिलियन युरो (सुमारे 560 कोटी रुपये) इतके बक्षीस देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या बातमीला राष्ट्रीय सुरक्षा समितीचे उपाध्यक्ष MAHMOUD NABAVIAN यांनीही दुजोरा दिला आहे.

इराण सरकारने 28 फेब्रुवारी रोजी झालेल्या हल्ल्यासाठी अमेरिका आणि इस्रायलला जबाबदार धरले आहे. या हल्ल्यात ALI KHAMENEI यांचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला असून, त्या घटनेचा सूड घेण्यासाठी हा कायदा आणला जात असल्याचे मानले जात आहे. या प्रकरणामुळे आधीच तणावपूर्ण असलेले संबंध आणखी बिघडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, महमूद नबावियन यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वरून अमेरिका आणि इस्रायलला इशारा दिला होता. भविष्यात इराणविरोधात कोणतीही कारवाई झाल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असे त्यांनी म्हटले होते. मात्र, प्लॅटफॉर्मच्या धोरणांमुळे ही पोस्ट नंतर हटवण्यात आली.

यापूर्वी 2026 च्या सुरुवातीला DONALD TRUMP यांनीही इराणला कडक इशारा देत, अमेरिकन नागरिक किंवा नेत्यांवर हल्ला झाल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, असे स्पष्ट केले होते. या घडामोडींमुळे मध्यपूर्वेतील परिस्थिती आणखी तणावपूर्ण बनली असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिले जात आहे.

### खळबळजनक प्रस्ताव...

इराणमध्ये अयातुल्ला खामेनेई यांच्या मृत्यूनंतर परिस्थिती अधिकच चिघळली असून, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्याविरोधात कोट्यवधी रुपयांच्या बक्षीसाचा वादग्रस्त प्रस्ताव संसदेत चर्चेत; त्यामुळे मध्यपूर्वेतील संघर्ष आणखी तीव्र होण्याची भीती व्यक्त होत आहे.




### फेब्रुवारीतील हल्ल्याचा सूड घेण्याचा प्रयत्न

दरम्यान, इराण सरकाने असा दावा केला आहे की, 28 फेब्रुवारी रोजी इराणवर झालेल्या हल्ल्यासाठी डोनाल्ड ट्रम्प, बेंजामिन नेत्यानहू आणि अमेरिकन सेंट्रल कमांडचे एडमिरल ब्रॅड कूपर हे जबाबदार आहेत. या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनेई यांचा मृत्यू झाला होता. इराणने या नेत्यांना इशारा दिला असून, त्यांना या कारवाईचे परिणाम भोगावे लागतील असे म्हटले आहे. हा प्रस्तावित कायदा म्हणजे आतापर्यंत मर्यादित असलेल्या धमक्यांना आता थेट संसदेच्या अधिकृत कारवाईचे स्वरूप देण्याचा प्रयत्न मानला जात आहे.

### मध्यपूर्वेत तणावाचा स्फोटक टप्पा

इराणच्या संसदेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष DONALD TRUMP आणि इस्रायलचे पंतप्रधान BENJAMIN NETANYAHU यांच्याविरोधात मोठ्या बक्षीसासंदर्भातील वादग्रस्त विधेयक चर्चेत आले असून, ALI KHAMENEI यांच्या मृत्यूनंतर मध्यपूर्वेतील परिस्थिती अधिकच तणावपूर्ण बनली आहे. या घडामोडींमुळे अमेरिका-इस्रायल-इराण संघर्ष तीव्र होण्याची शक्यता असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर गंभीर परिणामांची भीती व्यक्त केली जात आहे.

# ‘एमआयटी एडीटी’ची ऐतिहासिक कामगिरी!

## भारतातील सर्वात मोठ्या रेडिओ-कंट्रोल्ड इलेक्ट्रिक विमानाची निर्मिती

**महाईन्यूज | पुणे**

**भारतीय विद्यार्थी संशोधन आणि एरोस्पेस नवोन्मेष क्षेत्रात ऐतिहासिक ठरणारी कामगिरी करत ‘एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी’ विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी भारतातील सर्वात मोठे रेडिओ-कंट्रोल्ड (आरसी) इलेक्ट्रिक फिक्स्ड-विंग विमान यशस्वीरीत्या डिझाईन, विकसित आणि उड्डाण केले आहे. ‘टीम स्कायट्रेक’ने विकसित केलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला ‘प्रोजेक्ट गरुडा’ असे नाव देण्यात आले आहे.**



‘एमआयटी एडीटी’ विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड सायन्स अंतर्गत एरोस्पेस इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी हे विमान पूर्णपणे स्वतः विकसित केले असून, या प्रकल्पासाठी ‘सेंटर फॉर रिसर्च, इनोव्हेशन अँड एंटरप्रेन्युअरशिप फॉर यंग ॲस्पिरंट्स’ (CRIEYA) मार्फत विद्यापीठाने अर्थसहाय्य केले आहे.

९.२५ मीटर एवढ्या विशाल विंगस्पॅनसह आणि २६१ किलो वजन असलेले हे विमान भारतात तयार झालेले सर्वात मोठे आणि सर्वाधिक वजनाचे रेडिओ-कंट्रोल्ड इलेक्ट्रिक विमान ठरले आहे. या प्रकल्पासाठी ‘CRIEYA’कडून तब्बल ४८ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.

या प्रकल्पाला ‘एमआयटी एडीटी’ विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र-कुलगुरू प्रा. डॉ. मंगेश कराड यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच कुलगुरू डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट डॉ. सायली गणकर, प्र-कुलगुरू (टेक्नॉलॉजी क्लस्टर) डॉ. रामचंद्र पुजेरी, प्र-कुलगुरू (इनोव्हेशन क्लस्टर) डॉ. मोहित दुबे, प्र-कुलगुरू (क्रिएटिव्ह क्लस्टर), कुलसचिव डॉ.महेश चोपडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अभियांत्रिकी विभागाचे अधिष्ठाता डॉ. सुदर्शन सानप, एरोस्पेस विभागप्रमुख डॉ. कमलेश कुलकर्णी, डॉ. सुनील डिंगरे तसेच CRIEYAचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संतोष दराडे यांनी सातत्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी विमानाची रचना, स्ट्रक्चरल फॅब्रिकेशन, एरोडायनॅमिक्स आणि स्थैर्य विश्लेषण, पिक्सहॉक फ्लाइट कंट्रोलर प्रणाली, आरटीके-जीपीएस आधारित नेव्हिगेशन, इलेक्ट्रिक प्रोपल्शन सिस्टीम, फ्लाइट टेस्टिंग, रिमोट पायलटिंग, स्ट्रक्चरल व्हॅलिडेशन आणि प्रोपल्शन ऑप्टिमायझेशन ही सर्व कामे स्वतंत्रपणे पार पाडली.

> “प्रोजेक्ट गरुडा हे अनुभवाधारित आणि नवोन्मेषप्रधान शिक्षणाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. विद्यार्थ्यांनी वर्गातील ज्ञानाचा वापर करून संशोधन, चिकाटी आणि संघभावनेच्या जोरावर राष्ट्रीय पातळीवरील एरोस्पेस क्षेत्रातील मोठी कामगिरी साध्य केली आहे. अशा प्रकल्पांमधून भारताचे भावी एरोस्पेस तज्ज्ञ आणि संशोधक घडतील, अशी आम्हाला आशा आहे. त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला विद्यापीठाने आवश्यक ती मदत पुरवून त्यांचा आत्मविश्वास वाढविला आहे.
>
> **- डॉ. मंगेश कराड,**
> **प्राध्यापक ‘एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ.**

# दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरास ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा

**महाईन्यूज | पुणे**

**पुण्यातील प्रसिद्ध दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरास ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात आला आहे. मंगळवारी राज्य सरकारने हा निर्णय जारी केला. दरम्यान, तीन वर्षांपूर्वी दगडूशेठ गणपती मंदिराचा ‘क’ वर्ग पर्यटन स्थळांच्या यादीत समावेश करण्यात आला होता. मात्र, पुण्यातील ऐतिहासिक स्थळांच्या जवळ असणारे हे मंदिर धार्मिक व सांस्कृतिक पर्यटन साखळीतील महत्त्वाचा भाग असून, ‘अ’ वर्ग स्थळांच्या निकषात बसते. त्यामुळे मंदिराचा ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळांच्या यादीत समावेश करण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.**



सन १८९३ मध्ये स्थापन झालेले हे मंदिर पुण्याच्या श्रद्धा, इतिहास, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक मानले जाते. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा सुरू केल्यानंतर पुण्यातील गणेशभक्तीला नवे स्वरूप मिळाले आणि त्यामध्ये दगडूशेठ गणपती मंदिराचे स्थान अत्यंत महत्त्वाचे ठरले. आज हे मंदिर केवळ धार्मिक स्थळ नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यटन क्षेत्रातील प्रमुख केंद्र म्हणूनही ओळखले जाते.

दररोज हजारो भाविक या मंदिरात दर्शनासाठी येतात. गणेशोत्सव काळात येथे भक्तांची विशेष गर्दी पाहायला मिळते. मंदिरातील सुवर्णमंडित गणेशमूर्ती, आकर्षक सजावट, भव्य प्रकाशयोजना आणि भक्तिमय वातावरण पर्यटकांना विशेष आकर्षित करते. देशाच्या विविध भागांसह परदेशातूनही अनेक पर्यटक पुणे भेटीदरम्यान या मंदिराला आवर्जून भेट देतात. त्यामुळे पुण्याच्या धार्मिक पर्यटन साखळीत या मंदिराचे महत्त्व अधिक वाढले आहे.

पर्यटन विभागाने आपल्या निर्णयात नमूद केले आहे की, हे मंदिर पुण्यातील ऐतिहासिक स्थळांच्या जवळ असून धार्मिक आणि सांस्कृतिक पर्यटनाचा महत्त्वाचा भाग आहे. राज्य शासनाने पर्यटन स्थळांसाठी निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता हे मंदिर करत असल्याने त्याचा ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. या दर्जामुळे मंदिर परिसरातील पर्यटन विकासाला चालना मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या निर्णयामुळे पुणे शहराच्या जागतिक पर्यटन नकाशावर अधिक ठळकपणे नोंद होण्यास मदत होणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### पुण्याच्या पर्यटन क्षेत्राला मोठी गती मिळणार

या निर्णयामुळे पुण्याच्या पर्यटन क्षेत्राला मोठी गती मिळणार असून स्थानिक व्यवसाय, हॉटेल उद्योग, वाहतूक व्यवस्था आणि रोजगारनिर्मितीलाही फायदा होणार आहे. तसेच, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचे प्रतीक म्हणून दगडूशेठ गणपती मंदिराची ओळख आणखी भक्कम होणार आहे. भाविक आणि पुणेकरांनी राज्य सरकारच्या या निर्णयाचे स्वागत करत आनंद व्यक्त केला आहे.

# अर्थसंकल्पात गोंधळ; ८०% उपसूचना फेटाळल्या

## ₹1100 कोटींच्या प्रस्तावांवर कात्री; सर्वसाधारण सभेत निधी वळवण्यावरून वाद तीव्र

**महाईन्यूज** I पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पावरून मोठा गोंधळ निर्माण झाला असून, नगरसेवकांनी दिलेल्या सुमारे ११०० कोटी रुपयांच्या उपसूचनांपैकी तब्बल ८० टक्के उपसूचना फेटाळण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे नाराज नगरसेवकांनी सर्वसाधारण सभेतच उपसूचना मंजूर करून घेण्याचा सपाटा लावल्याचे चित्र पाहायला मिळाले.**

महापौर रवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत विविध विकासकामांना उपसूचनांद्वारे मंजुरी देण्यात आली. सत्ताधाऱ्यांनी निधी वळवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत विरोधकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. अनेक विषयांवर निधी वाढ-घट, नवीन लेखाशीर्ष निर्माण करणे आणि कामांना प्रशासकीय मान्यता देण्याच्या उपसूचना मंजूर करण्यात आल्या.

शहरातील ड्रेनेज व्यवस्थेसाठी मास्टर प्लॅनअंतर्गत नवीन मैला शुद्धीकरण प्रकल्प उभारणे, नाल्यांमधील लाईन स्थलांतर, ताथवडे व दापोडी येथे नवीन प्रकल्प उभारणे यांसारख्या कामांसाठी निधी वाढवण्यात आला आहे. तसेच किवळे येथील पंप हाऊस, चिखलीतील रस्ते विकास, तसेच पाणीपुरवठा विभागाच्या ३२ पंप हाऊसच्या देखभाल-दुरुस्ती खर्चालाही मंजुरी देण्यात आली.

प्रभागनिहाय विकासकामांमध्येही मोठ्या प्रमाणावर तरतुदी करण्यात आल्या. पिंपळे सौदागर येथील पी.के. चौक सिग्नल फ्री प्रकल्पासाठी ४५ कोटींवरून ८६ कोटी, तर पिंपळे गुरव येथील सबवे प्रकल्पासाठी ३५ कोटींवरून ५१ कोटींची तरतूद करण्यात आली. विविध प्रभागांमध्ये रस्ते, उद्याने, विद्युत सुविधा, जलतरण तलाव आणि व्यायामशाळा उभारणीसाठी निधी मंजूर करण्यात आला.



### उपसूचनांचा पाऊस, मंजुरीत मात्र कात्री

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 2026-27 च्या अर्थसंकल्पात तब्बल ₹1100 कोटींच्या उपसूचना नगरसेवकांकडून सादर करण्यात आल्या; मात्र त्यापैकी सुमारे 80% उपसूचना प्रशासनाने फेटाळल्या. त्यामुळे नाराज नगरसेवकांनी सर्वसाधारण सभेत उपसूचनांच्या माध्यमातून विविध विकासकामांना मंजुरी मिळवण्याचा सपाटा लावला. प्रभागनिहाय कामांसाठी निधी वळवण्याचे अनेक प्रस्ताव मंजूर करण्यात आले, ज्यामुळे अर्थसंकल्पीय शिस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. या प्रक्रियेमुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली असून, निधी वाटपाच्या पारदर्शकतेवरही गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

महापालिकेने अर्थसंकल्पात काही नवीन लेखाशीर्षही निर्माण केले आहेत. हरित सेतू प्रकल्पासाठी ग्रीन बॉण्डद्वारे उभारलेला २०० कोटींचा निधी स्वतंत्रपणे वापरण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पग्रस्तांसाठी स्वतंत्र निधी आणि झोपडपट्टी विकासासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, चिखली टॉऊन हॉलच्या नामकरणावरूनही राजकीय वाद पेटला आहे. भाजपकडून संत तुकाराम महाराजांचे नाव देण्याची मागणी करण्यात आली असून, राष्ट्रवादी काँग्रेसकडून अजित पवार यांचे नाव देण्याची उपसूचना देण्यात आली आहे. यावर अंतिम निर्णय महापौर घेणार असल्याने या विषयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकूणच, अर्थसंकल्पातील मोठ्या प्रमाणातील उपसूचना, निधी वळवण्याचे आरोप आणि नामकरणावरील वाद यामुळे महापालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये इंधन टंचाईची भीती; पेट्रोल पंप अचानक बंद

**महाईन्यूज** I
पिंपरी-चिंचवड

**शहरात शनिवारी दुपारनंतर आणि रविवारी सकाळपासून अनेक पेट्रोल पंप अचानक बंद दिसू लागल्याने नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे. 'पेट्रोल संपले', 'सेवा तात्पुरती बंद', 'नो स्टॉक' असे फलक अनेक ठिकाणी झळकू लागल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.**

काही पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या, तर अनेकांना एका पंपावरून दुसऱ्या पंपावर भटकंती करावी लागली. या अचानक निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण पसरले. खबरदारी म्हणून काही नागरिकांनी अतिरिक्त इंधन भरण्याचा प्रयत्न केल्याने पंपांवर अनावश्यक गर्दी वाढली. परिणामी उपलब्ध साठा अधिक वेगाने संपत असल्याचे चित्र शहरात दिसून आले.

दरम्यान, इंधन पुरवठ्यातील बदलांमुळे ही परिस्थिती उद्भवल्याची माहिती समोर येत आहे. पूर्वी काही पंपांना क्रेडिट सिस्टिमवर टँकर मिळत होते; मात्र आता ही सुविधा बंद करण्यात आली आहे. पेमेंट झाल्याशिवाय टँकर सोडला जात नसल्याने पुरवठा मंदावला आहे. याशिवाय पूर्वीप्रमाणे डबल टँकर मिळत नसल्याने साठ्यावर परिणाम झाला असून, सध्या इंधन तुटवड्याची स्थिती निर्माण झाली आहे. "आधी काही पंपांना क्रेडिटवर टँकर मिळत होते; पण आता ती व्यवस्था बंद झाली आहे. पेमेंटशिवाय टँकर मिळत नाही. त्यामुळे पुरवठा कमी झाला असून सध्या फ्युल शॉर्टेज जाणवत आहे," अशी माहिती चिंचवड येथील पेट्रोल पंप मालक राजेश गावडे यांनी दिली. रविवारी सायंकाळी पेट्रोल भरण्यासाठी गेलेल्या देवदत्त पडवळ यांनी सांगितले, "सलग दोन पेट्रोल पंप बंद पाहून धक्का बसला. सोशल मीडियावर विविध चर्चा सुरू असल्याने नेमकी परिस्थिती काय आहे हे समजत नव्हते. रोजच्या कामासाठी प्रवास करावा लागतो, त्यामुळे अडचण निर्माण झाली."



शहरातील या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इंधन कंपन्या आणि प्रशासनाने अधिकृत माहिती देऊन नागरिकांचा संभ्रम दूर करण्याची गरज व्यक्त होत आहे. पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जात असले, तरी सध्याची स्थिती वाहनचालकांसाठी मोठी गैरसोय ठरत आहे.

> “पहिल्यापेक्षा पेट्रोल-डिझेलचा पुरवठा कमी झाला आहे. आधी काही पंपांना क्रेडिट सिस्टिमवर टँकर मिळत होते; पण आता ती व्यवस्था बंद केली आहे. पेमेंट झाल्याशिवाय टँकर सोडला जात नाही. पूर्वी मिळणारा डबल टँकर आता मिळत नाही. सध्या फ्युल शॉर्टेजची परिस्थिती आहे.
>
> - **राजेश गावडे,** पेट्रोल पंप मालक, चिंचवड



## भूमिका

**आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या रंगमंचावर शब्द आणि कृती यांच्यातील दरी अनेकदा ठळकपणे दिसून येते. नुकत्याच नवी दिल्ली येथे झालेल्या ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत याचे स्पष्ट दर्शन घडले. भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीकडून जागतिक ऊर्जा संकटाला कारणीभूत ठरलेल्या इराण-अमेरिका संघर्षावर ठोस भूमिका अपेक्षित होती.**

# राजनैतिक थकव्याने एकाकी इराणला भारताचाच आधार!



मात्र, संयुक्त निवेदनाविना बैठक संपल्याने केवळ मतभेदच नव्हे, तर काही देशांच्या दुटप्पी भूमिकाही उघड झाल्या. इराण आणि रशिया यांनी भारताचे कौतुक करताना त्याला 'शांततेचा दुवा' आणि 'मध्यस्थीची क्षमता असलेला देश' म्हणून गौरवले. परंतु, या शब्दांमागील वास्तव वेगळेच होते. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी पाश्चिमात्य वर्चस्वाविरोधात एकत्र येण्याचे आवाहन केले, पण त्याचवेळी भारताला निर्णायक प्रक्रियेपासून दूर ठेवले. रशियाचे सर्गेई लावरोव्ह यांनीही भारताच्या क्षमतेची प्रशंसा केली, मात्र प्रत्यक्षात त्यांनी इराणवर भारताच्या सहभागासाठी दबाव आणण्याचे टाळले.

या संपूर्ण घडामोडींमध्ये सर्वाधिक लक्षवेधी बाब म्हणजे पाकिस्तानची अचानक वाढलेली भूमिका. एप्रिल २०२६ मध्ये प्रस्तावित युद्धविराम आराखडा आणि अमेरिका-इराण चर्चांचे आयोजन इस्लामाबादमध्ये होणे, हे भारतासाठी केवळ राजनैतिक धक्का नव्हे, तर त्याच्या प्रादेशिक प्रभावालाही आव्हान होते. भारताने सातत्याने मध्यस्थीची तयारी दर्शवूनही त्याला डावलले जाणे, हा एक विचार करण्यास भाग पाडणारा मुद्दा आहे.

यामागे तात्कालिक सोयीसाठी घेतलेले निर्णय स्पष्टपणे दिसतात. इराणने दीर्घकालीन विश्वासू भागीदार असलेल्या भारताऐवजी तात्पुरत्या राजनैतिक समीकरणांना प्राधान्य दिले. मात्र, अशा निर्णयांचे परिणाम दीर्घकालीन असतात. होर्मूझ सामुद्रधुनीतील निर्बंधांमुळे भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर झालेला परिणाम हे त्याचेच उदाहरण आहे. दरम्यान, पाकिस्तानची मध्यस्थीही मर्यादांमध्ये अडकलेली दिसते. अंतर्गत राजकीय अस्थिरता, आर्थिक अडचणी आणि आंतरराष्ट्रीय विश्वासार्हतेचा अभाव यामुळे इस्लामाबादची भूमिका टिकाव धरू शकलेली नाही. परिणामी, इराणसाठी पर्याय कमी होत चालले आहेत. याच पार्श्वभूमीवर भारताची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. भारताची राजनैतिक ताकद ही तात्पुरत्या समीकरणांवर आधारित नसून, दीर्घकालीन विश्वास, संतुलित धोरण आणि सर्वांशी संवाद ठेवण्याच्या क्षमतेवर उभी आहे. भारताने कधीही आक्रमक भूमिका न घेता संवादाचा मार्ग स्वीकारला आहे, ही त्याची मोठी ताकद आहे. आता इराणसमोर वास्तव स्पष्ट होत आहे. तात्कालिक राजकारणाच्या पलीकडे जाऊन स्थिर आणि विश्वासार्ह भागीदाराची गरज निर्माण झाली आहे. अशा वेळी भारतच तो पर्याय ठरू शकतो. मात्र, यासाठी केवळ शब्दांचे कौतुक पुरेसे ठरणार नाही; त्याची कृतीतूनही प्रचिती यायला हवी.

शेवटी, आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये विश्वास हा सर्वात मोठा भांडवल असतो. इराणने भारताशी असलेले संबंध पुन्हा दृढ करण्याची हीच योग्य वेळ आहे. अन्यथा, राजनैतिक थकवा अधिक गडद होईल आणि एकाकीपणातून बाहेर पडणे अधिक कठीण ठरेल.

## प्रासंगिक »

### अविचार

**एका शिकार्याने रानात एक कोल्हा पाहिला. तो इतका सुंदर दिसत होता की, त्याचे कातडे आपल्याजवळ असावे अशी त्या शिकार्याला इच्छा झाली**

त्याने त्या कोल्ह्याचे बीळ शोधून काढले व त्या बिळाच्या तोंडापुढे एक खड्डा खणला. नंतर त्या खड्ड्यात काही वाळलेली झुडपे घातली व त्यावर मोठा मांसाचा तुकडा ठेवला. कोल्हा तो मांसाचा तुकडा पाहून तेथे येईल व खड्ड्यात पडेल असे त्याला वाटले. सर्व तयारीनंतर तो शिकारी एका झाडापाठीमागे लपून बसला. थोडया वेळाने कोल्हा बाहेर आला व समोरच असलेला मांसाचा तुकडा पाहून तो खावा असे त्याला वाटले; पण त्यात काहीतरी कट असावा असे वाटून तो पुन्हा आपल्या बिळात जाऊन बसला. इतक्यात एक वाघ तेथे आला. काही विचार न करता त्याने त्या मांसाच्या तुकड्यावर झडप घातली व तो खड्ड्यात पडला. त्याच्या पडण्याचा आवाज त्या शिकाऱ्याने ऐकला व तो धावत तेथे गेला. खड्ड्यात कोल्हा पडला असे समजून त्याने खड्ड्यात उडी मारली, तेव्हा वाघाने त्याला फाडून खाल्ले.

- तात्पर्य : अविचाराने नेहमी अनर्थ घडत असतात.

पहलगाम येथे एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने घेतलेल्या निर्णयांनी भारत-पाक जलसंबंध पुन्हा चर्चेत आले आहेत. विशेषतः 'सिंधू जल करार' स्थगित ठेवण्याच्या भूमिकेमुळे पाण्याच्या हक्कांवर आणि त्याच्या वापरावर

# भारत-पाकमधून वाहणाऱ्या नद्यांचे पाणी कुणाचे?

वापरावर नव्याने प्रश्न उपस्थित झाले आहेत. "नद्यांचे पाणी नेमके कुणाचे?" हा प्रश्न केवळ भौगोलिक नसून, तो राजनैतिक, ऐतिहासिक आणि सामरिक वास्तवाशी जोडलेला आहे.

१९६० साली जागतिक बँकेच्या मध्यस्थीने झालेल्या सिंधू जल करारानुसार, सिंधू, झेलम आणि चिनाब या पश्चिमेकडील नद्या पाकिस्तानला देण्यात आल्या, तर रावी, बियास आणि सतलज या पूर्वेकडील नद्यांवर भारताचा अधिकार निश्चित करण्यात आला. या करारानुसार भारताला सुमारे २०% पाणी, तर पाकिस्तानला जवळपास ८०% पाणी मिळते. भारताने हा करार गेली अनेक दशके अत्यंत प्रामाणिकपणे पाळला आहे, अगदी युद्ध आणि दहशतवादी हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवरही.

मात्र, बदलत्या परिस्थितीत या कराराच्या मर्यादा अधिक ठळकपणे समोर येऊ लागल्या आहेत. वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि हवामान बदल यामुळे पाण्याची गरज झपाट्याने वाढत आहे. त्यातच पाकिस्तानकडून सुरू असलेल्या



दहशतवादी कारवायांमुळे भारताने आपल्या धोरणाचा पुनर्विचार करणे अपरिहार्य ठरले आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने घेतलेली कठोर भूमिका ही याच बदलत्या वास्तवाची परिणती आहे.

भारताने पूर्वेकडील नद्यांवरील आपले हक्क अधिक प्रभावीपणे वापरण्यास सुरुवात केली आहे. रावी आणि सतलज नद्यांचे पाणी पाकिस्तानकडे जाणे कमी करण्यासाठी विविध प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. तसेच पश्चिमेकडील नद्यांवर जलविद्युत निर्मिती आणि मर्यादित वापराचे अधिकारही अधिक सक्रियपणे वापरले जात आहेत. हे सर्व करताना भारताने कराराच्या चौकटीत राहण्याचा प्रयत्न केला आहे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

दुसरीकडे, पाकिस्तानने या मुद्द्याचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. 'भारत पाणी रोखत आहे' असा प्रचार करून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न होत आहे. मात्र, या कथनात दहशतवादाचा मुद्दा जाणीवपूर्वक दुर्लक्षित केला जातो. कोणत्याही कराराचे पालन हे परस्पर विश्वासावर आधारित असते, आणि जेव्हा हा विश्वास वारंवार भंग होतो, तेव्हा कराराचे पुनर्मूल्यांकन अपरिहार्य ठरते. पाणी हे केवळ नैसर्गिक संसाधन नाही, तर ते सामरिक शक्तीचे साधनही बनले आहे. अशा परिस्थितीत भारताने आपल्या राष्ट्रीय हितांचे रक्षण करताना संतुलित आणि ठाम भूमिका घेणे आवश्यक आहे. 'शठं प्रति शाठ्यम्' ही भूमिका काहींना कठोर वाटू शकते, पण सततच्या उकसावणुकीसमोर ती वास्तववादी ठरते. शेवटी, भारत-पाक जलप्रश्न हा केवळ पाण्याचा नाही, तर विश्वास, सुरक्षा आणि दीर्घकालीन स्थैर्याचा प्रश्न आहे. भविष्यातील समाधान हे संघर्षात नव्हे, तर जबाबदार आणि पारदर्शक संवादातच दडलेले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अमर आहां अमर आहां ।
खरें कीं पाहा खोटें हें ॥१॥

न म्हणां देह माझा ऐसा ।
मग भरवसा कळेल ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# प्रशांत किशोर राष्ट्रवादीचे सल्लागार?

## अरोरा यांच्यानंतर थेट प्रशांत किशोर राष्ट्रवादीची धुरा सांभाळणार अशा बातम्या पसरल्या

**महाईन्यूज । मुंबई**

**प्रसिद्ध राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर आता अजित पवारांच्या राष्ट्रवादीसाठी काम करणार अशा आशयाच्या बातम्या समोर येऊ लागल्या आहेत. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार आणि प्रशांत किशोर यांच्यात बैठक पार पडल्याचे वृत्त समोर आल्यानंतर यासंबधित दावा केला जाऊ लागला. निलेश अरोरा यांच्यानंतर प्रशांत किशोर राष्ट्रवादीची रणनिती ठरवतील असा दावा विविध वृत्तांच्या माध्यमांतून केला जात आहे. याबाबत आता खुद्द पार्थ पवार यांनी स्पष्टीकरण दिले असून, या दाव्यांमध्ये किती तथ्य आहे? याचा खुलासा केला आहे.**

हाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एक नवी चर्चा सुरु आहे. निवडणूक रणनीतीचे 'मास्टरमाइंड' मानले जाणारे प्रशांत किशोर हे आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी रणनीती आखणार का? अशी जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, प्रशांत किशोर आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यात नुकतीच एक महत्त्वाची बैठक पार पडल्याची माहिती समोर येत आहे. या बैठकीला खासदार पार्थ पवार आणि जय पवारही उपस्थित असल्याची चर्चा आहे. सूत्रांच्या दाव्यानुसार, या बैठकीत आगामी राजकीय रणनीती, पक्षाची संघटनात्मक बांधणी आणि भविष्यातील निवडणूक तयारी यावर सविस्तर चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही वरिष्ठ नेत्यांनी या चर्चेला "सकारात्मक" असल्याचे संकेत दिल्याची माहितीही पुढे येत आहे.



### पार्थ पवारांनी खोडून काढला दावा

राज्यसभा खासदार पार्थ पवार यांनी प्रशांत किशोर राष्ट्रवादीबरोबर काम करणाऱ्या असल्याचा दावा खोडून काढताना, त्यांना घरी स्नेहभोजनासाठी आमंत्रित केल्याचे सांगितले. किशोर यांनी राजकीय सल्लागार क्षेत्रातून निवृत्ती घेऊन आता काही वर्षे झाल्याचेही पार्थ पवारांनी एक्स या समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये स्पष्ट केले. आम्ही एकमेकांसाठी नेहमीच खंबीरपणे उभे आहोत आणि भविष्यातही एकमेकांसाठी आवश्यक असेल तिथे तत्पर राहू, असे पार्थ या पोस्टमध्ये म्हणाले.

> "प्रशांत किशोर आमचे स्नेही असून माझ्या बंधूसमान आहेत. दादांच्या काळापासून आमचे त्यांच्याशी घनिष्ठ संबंध आहेत. काल ते शहरात आले होते, त्यामुळे त्यांना आमच्या घरी भोजनासाठी आमंत्रित करण्याचा आणि त्यांच्याशी अभ्यासपूर्ण चर्चा करण्याचा आनंद मिळाला. राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर काम करण्याबाबत होत असलेल्या चर्चांवर मी स्पष्ट करू इच्छितो की, माझ्या माहितीनुसार, त्यांनी राजकीय सल्लागार क्षेत्रातून निवृत्ती घेऊन आता काही वर्षे झाली आहेत. भविष्यातही यात काही बदल होईल असे मला वाटत नाही."
>
> **- पार्थ पवार, खासदार, राष्ट्रवादी (अजित पवार गट).**

### विविध दाव्यांनंतर स्पष्टीकरण

प्रशांत किशोर आता राष्ट्रवादी काँग्रेससाठी राजकीय सल्लागार म्हणून काम करणार असल्याचे वृत्त समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते. अजित पवारांच्या राष्ट्रवादीसाठी यापूर्वी डिझाईन बॉक्सड् या कंपनीच्या निलेश अरोरा यांनी काम केले आहे. विधानसभा निवडणुकीत गाजलेली राष्ट्रवादीची गुलाबी जॅकेट ही संकल्पना अरोरा यांचीच असल्याचे सांगितले जाते. दरम्यान, आता अरोरा यांच्यानंतर प्रशांत किशोर राष्ट्रवादीसाठी सल्लागार म्हणून काम करणार असल्याचे वृत्त समोर आल्यानंतर खुद्द पार्थ पवारांनी या चर्चांवर पडदा टाकला आहे. मात्र, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या रणनीतीत मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

# 'तरुण भारत संवाद' चे विश्वास दिवे यांना उत्कृष्ट उपसंपादक पुरस्कार!

**महाईन्यूज । कोल्हापूर**

**कोल्हापूर प्रेस क्लबच्या वतीने २०२४ आणि २०२५ या वर्षातील पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आले.**



दसरा चौकातील शहाजी छत्रपती महाविद्यालयातील स्वर्गीय यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या या सोहळ्यात तरुण भारत संवादचे विश्वास दिवे यांना उत्कृष्ट उपसंपादक पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच पोपट पवार, आदित्य वेल्हाळ, शेखर पाटील, सचिन सावंत, नयन यादवाड, राजकुमार चौगुले, राहुल गायकवाड, पांडुरंग पाटील, विकास पाटील आणि महेश कांबळे यांनाही विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि पाच हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार ओतारी लिखित पुस्तकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. परीक्षक संजय पाटोळे, कृष्णात जमदाडे, सचिन आडसूळ, अलोक जत्राटकर, संजीव देवरूखकर आणि सुरेंद्र जैन यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक, सुरेंद्र जैन, प्रेस क्लबचे उपाध्यक्ष प्रशांत आयरेकर, कार्याध्यक्ष दिलीप भिसे, खजिनदार दीपक घाटगे, सहसचिव संग्राम काटकर, संचालक राहुल बामणे, दीपक जाधव, माहिती उपसंचालक प्रवीण टाके, जयेश ओसवाल, प्रा. महादेव नरके, रवि जाधव, राहुल चिकोडे, रूपेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे यांनी प्रास्ताविक केले. समीर देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले, तर सचिव बाबुराव रानगे यांनी आभार मानले.

### मान्यवरांचे मार्गदर्शन

पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांचा गौरव होत असल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमात पत्रकारितेतील बदलते प्रवाह, सामाजिक जबाबदारी आणि निष्पक्ष वृत्तांकन यावरही मान्यवरांनी मार्गदर्शन केले. युवा पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अनुभवी पत्रकारांकडून प्रेरणा घेतली. पुरस्कार विजेत्यांच्या कार्याचा गौरव करताना उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. समाजहित जपत निर्भीड पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांची आजच्या काळात नितांत गरज असल्याचे मत अनेक मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.

# छत्तीसगडमधील बस्तर नक्षलमुक्त!

## अमित शाह म्हणाले छत्तीसगडमधील जनतेच्या मनातील नक्षलवादाची भीती संपली

**महाईन्यूज । छत्तीसगड**

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी छत्तीसगडमध्ये पत्रकार परिषद घेतली. या परिषदेदरम्यान त्यांनी बस्तरमधून नक्षलवाद समूळ नष्ट झाल्याचा दावा केला. केवळ छत्तीसगडमधील बस्तरमधूनच नव्हे, तर संपूर्ण देशातून नक्षलवाद समूळ नष्ट झाला आहे. छत्तीसगडचा बस्तर जिल्हा नक्षलवादाने मोठ्या प्रमाणात प्रभावित झाला होता, परंतु आज तेथून नक्षलवाद पूर्णपणे संपुष्टात आला आहे.**




छत्तीसगडमधील भीतीचे वातावरण आता संपुष्टात आले आहे, असा विश्वास अमित शाह यांनी व्यक्त केला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नक्षलवादाविरोधातील सध्याची रणनीती आणि सरकारच्या योजनांबद्दल सविस्तरपणे सांगितले. नक्षलवाद संपवण्याचे संपूर्ण श्रेय सुरक्षा दलांना जाते, असे त्यांनी नमूद केले. हा लढा अंतिम टप्प्यात आणण्यासाठी सैनिकांनी सर्वोच्च बलिदान दिले आहे, असेही ते म्हणाले. नक्षलमुक्त भारत घडवण्यात देशाच्या सैनिकांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे, असा पुनरुच्चार त्यांनी केला. या कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री विष्णू देव साय आणि गृहमंत्री विजय शर्मा हेदेखील उपस्थित होते.

अमित शाह यांनी सांगितले की, केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नांमुळे नक्षलवादाविरोधातील मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. दुर्गम भागांमध्ये रस्ते, शिक्षण, आरोग्य आणि इंटरनेट सुविधा पोहोचवल्यामुळे स्थानिक नागरिकांचा शासनावरील विश्वास वाढला आहे. आदिवासी भागातील तरुणांना रोजगार आणि शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजना राबवण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### दुग्धव्यवसायाचे जाळे उभारणार

गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, नक्षलवाद संपल्यानंतर ते पहिल्यांदाच बस्तरमध्ये आले आहेत. बस्तरमध्ये विकासाची नवी सुरुवात झाली आहे. नक्षलवादामुळे छत्तीसगडमधील विकासाला खीळ बसली होती. १९ मे २०२६ ही तारीख महत्त्वपूर्ण आहे. आम्ही बस्तर विभागात एक मोठे दुग्धव्यवसाय जाळे उभारणार आहोत. बस्तरमध्ये विकासाची नवी सुरुवात झाली आहे. बस्तरमधील प्रत्येक आदिवासी व्यक्तीला एक गाय आणि एक म्हैस दिली जाईल. आम्ही वन उत्पादनाचे फायदे आदिवासी लोकांपर्यंत पोहोचवणार आहोत.

### काँग्रेसने नक्षलवाद संपवण्यात सहकार्य केले नाही

गृहमंत्री अमित शाह काँग्रेसवर टीका करताना म्हणाले की, बस्तर नक्षलमुक्त झाला ही आपल्या सर्वांसाठी आनंदाची बाब आहे. पण छत्तीसगडमधील काँग्रेस सरकारने नक्षलवाद संपवण्यासाठी आम्हाला सहकार्य केले नाही. काही तारखा महत्त्वाच्या आहेत. १३ डिसेंबर २०२३ रोजी भाजपचे सरकार सत्तेवर आले. मी निःसंकोचपणे सांगू शकतो की, भाजप सरकार सत्तेवर आल्यावर नक्षलवाद्यांविरुद्धची कारवाई तीव्र करण्यात आली आणि आज त्याचे परिणाम सर्वांसमोर आहेत.

# इराणवर पुन्हा लष्करी हल्ला करावा लागू शकतो, डोनाल्ड ट्रम्प यांचे संकेत

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षावर अद्याप तोडगा निघालेला नाही. पाकिस्तानमध्ये फिस्कटलेल्या चर्चेच्या पहिल्या फेरीनंतर उभय देशात पुन्हा चर्चा झालेली नाही. इराणकडून देण्यात येणारे प्रस्ताव डोनाल्ड ट्रम्प धुडकावून लावत आहेत. अशात इराणवर पुन्हा एकदा लष्करी हल्ला करावा लागू शकतो, असे संकेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी दिले आहेत. इराणवर हल्ला करण्याचा निर्णय घेण्यापासून अवघा एक तास दूर होतो, असाही खुलासा ट्रम्प यांनी केला. आखाती देशांच्या विनंतीमुळे नियोजित हल्ला पुढे ढकलल्याचे ट्रम्प म्हणाले.**



डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी आजच इराणवर कारवाई करण्याचा विचार होता असा खुलासा त्यांनी केला. “हल्ल्याचा घेण्यापासून मी केवळ एक तास दूर होतो,” असे ट्रम्प म्हणाले. “इराणचे नेते युद्धबंदीच्या करारासाठी विनंती करत आहेत. येत्या काही दिवसांत करार न झाल्यास अमेरिका पुन्हा एकदा मोठा हल्ला करू शकते”, असा इशारा ट्रम्प यांनी यावेळी दिला. इराणकडे अत्यंत मर्यादित वेळ त्यांच्याकडे शिल्लक असल्याचे सूचक विधान देखील ट्रम्प यांनी केले.

रॉयटर्स या वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, “माझ्या मते पुढील दोन-तीन दिवस, कदाचित शुक्रवार, शनिवार, रविवार किंवा पुढच्या आठवड्याच्या सुरुवातीचा काळ... अत्यंत मर्यादित वेळ त्यांच्याकडे (इराणकडे) उरलेला आहे. कारण आम्ही त्यांना कोणत्याही परिस्थितीत नवीन अण्वस्त्र तयार करू देणार नाही,” असे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. गेल्या आठवड्यात देखील ट्रम्प यांनी इराणकडे मर्यादीत वेळ शिल्लक असल्याचे वक्तव्य केले होते. इराणसाठी घड्याळाचे काटे वेगाने फिरत आहेत, असे ट्रम्प म्हणाले. होते.

### इराणचा नवा प्रस्ताव

आयआरएनए या इराणी वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, इराणने युद्धसमाप्तीसाठी अमेरिकेसमोर नवा प्रस्ताव मांडला आहे. या प्रस्तावात इराणवर अमेरिकेकडून लादण्यात आलेले सर्व निर्बंध हटविण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच गोठविण्यात आलेला निधी सोडण्यात यावा आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीत असणारे अमेरिकेची नाकेबंदी हटविण्याची मागणी करण्यात आलीय. याशिवाय युद्धामुळे झालेल्या नुकसानाची भरपाई देणे, इराणच्या जवळच्या भागांतून अमेरिकी सैन्य माघारी घेणे आणि लेबनॉनसह इतर भागातील संघर्ष समाप्त करण्याच्या अटींचा प्रस्तावात समावेश आहे.

### इराणचा अमेरिकेला इशारा


इराणवर नियोजित लष्करी हल्ला अखाती देशांच्या विनंतीवरुन रद्द केल्याचे डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. कतार, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती यांसारख्या मध्यपूर्वेतील प्रमुख अमेरिकन मित्रराष्ट्रांच्या नेत्यांनी केलेल्या विनंतीनंतर हा हल्ला तूर्तास मागे घेण्याचा निर्णय घेतला, असे ट्रम्प म्हणाले. दरम्यान, इराणने देखील आक्रमक पवित्रा घेतल्याचे समोर आले आहे. अमेरिकेने इराणवर पुन्हा हल्ला केल्यास, अमेरिकेविरुद्ध युद्धाच्या नवीन आघाड्या उघडल्या जातील, असे इराणच्या लष्कराने ट्रम्प प्रशासनाला इशारा दिला आहे.



# ज्या चित्रपटाला दिला होता नकार, तोच सुपरहिट!


अभिनेत्री डेझी शाहने 'जय हो' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. मात्र, या चित्रपटापूर्वी तिला सलमान खानच्या एका मोठ्या चित्रपटाची ऑफर नाकारली होती. याविषयी नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत डेझीने सविस्तर भाष्य करत खुलासा केला. सलमान खानचे अनेक बिग बजेट चित्रपट हिट ठरले आहेत. हिट ठरलेल्या चित्रपटांची यादी मोठी आहे. या यादीत बॉडीगॉर्ड चित्रपटाचा समावेश होतो. करिना कपूर खान या चित्रपटात मुख्य भूमिकेत होती. डेझी शाहला याच चित्रपटात काम करण्यासाठी सलमान खानकडून विचारणा करण्यात आली होती. पण डिझीने चित्रपटात काम करण्यास नकार कळवला होता. 'बॉलिवूड बबल'ला दिलेल्या डेझीने सांगितले की, 'बॉडीगार्ड' चित्रपट नाकार दिल्यानंतर सलमान खान काही मिनिटे पूर्णपणे शांत झाला होता. "मी त्याला काम करण्यासा नकार दिल्यानंतर खोलीत जवळपास पाच ते सात मिनिटे शांतता होती. ती वेळ मला खूप मोठी वाटत होता. मी मनात सतत म्हणत होते, 'काहीतरी बोल ना.' अखेर त्याने फक्त एकच शब्द उच्चारला 'ठीक आहे.'" दीड वर्षानंतर सलमानने पुन्हा डेझीशी संपर्क साधला आणि तिला 'जय हो'साठी ऑडिशन देण्यास सांगितले. अखेरीस तिला ती भूमिका मिळाली आणि २०१४ मध्ये तिने जय हो चित्रपटात सलमान खानसोबत स्क्रिन शेअर केली. या चित्रपटाद्वारे तिने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारशी काही कमाल करू शकला नाही, हे गोष्टी वेगळी. सलमान खानच्या स्वभावाबद्दल बोलताना डेझीने त्याचे कौतुक केले. "तो इंडस्ट्रीतील सर्वात काळजी घेणाऱ्या लोकांपैकी एक आहे. सेटवर असो किंवा वैयक्तिक आयुष्यात, तो आपल्या जवळच्या लोकांची कायम काळजी घेतो," असे डेझी म्हणाली. अभिनेत्री होण्यापूर्वी डेझी शाह नृत्यदिग्दर्शक गणेश आचार्य यांच्याकडे सहाय्यक नृत्यदिग्दर्शक म्हणून काम करत होती. त्यानंतर तिने दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत प्रवेश केला आणि अनेक गाण्यांमध्ये काम केले. यानंतरच सलमान खानने तिला 'बॉडीगार्ड'साठी विचारणा केली होती, पण डेझीने त्याला नकार दिला. त्यानंतर 'जय हो'मध्ये तिला मुख्य भूमिका मिळाली. त्यानंतर ती फारशी चित्रपटात दिसली नसली तरी आयटम साँगमुळे सतत चर्चेत असतं.

# म्हणून प्रोडक्शन हाऊस बंद केलं



अभिनेता म्हणून काम करणाऱ्या सैफ अली खान (Saif Ali Khan) याने काही वर्षांपूर्वी निर्माता म्हणूनही बॉलिवूडमध्ये स्वतःची वेगळी एक ओळख निर्माण केली होती. मात्र, काही यशस्वी चित्रपटांची निर्मिती केल्यानंतर त्याने स्वतःचे प्रॉडक्शन हाऊस 'इल्लुमिनाटी फिल्म्स' (Illuminati Films) बंद केले. आता यामागचे कारण सैफने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत स्पष्ट केले आहे. सैफ सध्या त्याच्या 'कर्तव्य' (Kartavya) या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात त्याने पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारलेली आहे. चाहत्यांकडून त्याच्या भूमिकेचे कौतुक केले जात आहे. मात्र, या चित्रपटाला थंड प्रतिसाद मिळाल्याचा दावा मीडिया रिपोर्टमधून करण्यात आला आहे.

# जॅकलीनचा ग्लॅमरस जलवा!



फ्रान्समध्ये सुरू असलेल्या प्रतिष्ठेच्या 'कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६'मध्ये यंदा अनेक बॉलिवूड अभिनेत्री आपल्या वेगवेगळ्या लूकमुळे चर्चेत आहेत. हुमा कुरेशी, मौनी रॉय, डायना पेंटी यांच्यानंतर आता अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिस (Jacqueline Fernandez ) हिनेही आपल्या ग्लॅमरस अंदाजाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. कान्स फेस्टिव्हलमधील तिच्या नव्या लूकचे फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. जॅकलीनने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर कान्स फिल्म फेस्टिव्हलमधील काही खास आणि ग्लॅमरस फोटो शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये ती वेगवेगळ्या स्टायलिश पोझ देताना दिसत आहे. तिचा आत्मविश्वासपूर्ण आणि आकर्षक अंदाज चाहत्यांना खूप आवडला आहे. या खास कार्यक्रमासाठी जॅकलीनने स्ट्रॅपलेस ब्लॅक मिनी ड्रेस परिधान केला होता. या ड्रेसमध्ये ती खूपच स्टायलिश आणि बोल्ड दिसत होती. साधा पण एलिगंट लूक ठेवत जॅकलीनने आपल्या फॅशन सेन्सची पुन्हा एकदा झलक दाखवून दिली. तिच्या या लूकने चाहत्यांना अक्षरशः घायाळ केले आहे. जॅकलीनने तिचा मेकअपही अतिशय सुंदर आणि क्लासी ठेवला होता. स्मोकी आय मेकअप आणि न्यूट्रल शेडची लिपस्टिक यामुळे तिचा लूक आणखी खुलून दिसत होता. तसेच तिने कोणतीही खास हेअरस्टाईल न करता केस मोकळे सोडले होते. त्यामुळे तिचा नैसर्गिक आणि आकर्षक लूक अधिक उठून दिसला. तिने या ड्रेससोबत डायमंड नेकलेस आणि मॅचिंग डायमंड ब्रेसलेट परिधान केले होते. या दागिन्यांमुळे तिच्या संपूर्ण लूकमध्ये आणखी ग्लॅमर वाढले. कानच्या रेड कार्पेटवर जॅकलीनचा हा स्टायलिश अंदाज सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे. जॅकलीनच्या या फोटोंना चाहत्यांकडून मोठ्या प्रमाणात लाईक्स आणि कमेंट्स मिळत आहेत. इतकेच नाही तर अभिनेत्री दिशा पाटनी, सोनम बाजवा आणि अनुष्का दांडेकर यांनीही तिच्या या लूकचे कौतुक केले आहे.

# 'पेद्दी'मुळे राम चरण भावूक



दाक्षिणात्य अभिनेता राम चरण याच्या आगामी 'पेद्दी' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला. ट्रेलर लॉन्च कार्यक्रमात राम चरणने बॉलिवूडमधील सुपरस्टार सलमान खान आणि आमिर खान यांचे खास आभार मानले. 'सुलतान' आणि 'दंगल'सारख्या क्रीडापटांवर आधारित चित्रपटांनी भारतीय सिनेमात स्पोर्ट्स ड्रामासाठी नवा मार्ग तयार केला, असे राम चरणने सांगितले. कार्यक्रमात बोलताना राम चरण म्हणाला की, "सर्वप्रथम सलमान सर आणि आमिर सर यांचे आभार. त्यांनी 'सुलतान' आणि 'दंगल'सारखे चित्रपट करून अशा प्रकारच्या कथांना प्रेक्षकांची पसंती मिळवून दिली. त्यामुळे आमच्यासारख्या कलाकारांना अशा विषयांवर काम करण्याचा आत्मविश्वास मिळाला." राम चरणने 'पेद्दी' चित्रपटाच्या निर्मितीप्रक्रियेबद्दलही अनेक गोष्टी सांगितल्या. त्याने दिग्दर्शक बुची बाबू सना यांचे विशेष कौतुक केले. तो म्हणाला की, "एकदा दिग्दर्शक माझ्या घरी आले होते. ते जमिनीवर बसून मला पूर्ण कथा सांगत होते. जवळपास दोन तास चाळीस मिनिटे मी फक्त त्यांचे बोलणे ऐकत होतो. कथा ऐकल्यानंतर मला समजले की हा चित्रपट शारीरिकदृष्ट्या खूप मेहनतीचा असणार आहे. पण कथेतली ताकद पाहून मी लगेच तयार झालो." राम चरणच्या मते, 'पेद्दी' ही फक्त स्पोर्ट्स ड्रामा फिल्म नाही, तर स्वतःची ओळख शोधणाऱ्या एका व्यक्तीची भावनिक कथा आहे. "प्रत्येक माणसाला आयुष्यात स्वतःची ओळख हवी असते. हा चित्रपट अशाच एका व्यक्तीचा प्रवास दाखवतो," असेही त्याने सांगितले. या चित्रपटात जान्हवी कपूर, बोमन इराणी आणि दिव्येंदू शर्मा हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. ट्रेलरमध्ये राम चरणचा दमदार आणि हटके अंदाज पाहायला मिळत असून प्रेक्षकांमध्ये चित्रपटाबद्दल उत्सुकता वाढली आहे.

# संजू-क्लासेनमध्ये मैदानावर राडा!

## सॅमसनचा जळता कटाक्ष अन् क्लासेन अंगावर धावून गेला

**महाईन्यूज । रोम**

**चेन्नई सुपर किंग्स व सनरायझर्स हैदराबाद यांच्यातील सामन्यात हेनरिक क्लासेन व संजू सॅमसन यांच्यात मैदानावरच वाद पाहायला मिळाला. संजू व क्लासेन दोघेही तसे शांत स्वभावाचे खेळाडू होते. पण या सामन्यात मात्र दोघेही चांगलेच संतापले होते. १५ व्या षटकात संजूने क्लासेनला कमालीच्या स्टंपिंगवर बाद केलं आणि त्यानंतर तिसऱ्या पंचांनी बाद दिल्यानंतर मैदानावर हा राडा झाला. ज्याचा व्हीडिओ सध्या व्हायरल होत आहे.**



चेन्नई सुपर किंग्सने प्रथम फलंदाजी करताना १८० धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात हैदराबाद संघाची सुरूवात खराब झाली. हेड ४ धावा करत माघारी परतला. तर अभिषेक शर्मा २६ धावा करत बाद झाला. यानंतर मैदानावर आलेल्या क्लासेनने आपल्या कमालीच्या फॉर्मसह वादळी फटकेबाजी करायला सुरूवात केली. स्पेन्सर जॉन्सनने क्लासेनचा झेल सोडल्याने त्याला जीवदान मिळालं. क्लासेन ४७ धावांवर खेळत असताना नूर अहमदच्या षटकात संजूने त्याला स्टंपिंग करत बाद केलं.

सॅमसन आणि क्लासेन यांच्यातील वाद १५ व्या षटकात झाला. क्लासेनने तिसऱ्या चेंडूवर नूर अहमदच्या गुगलीवर मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला, पण तो चुकला. क्लासेनचा पाय वर उचलला गेला आणि संजू सॅमसनने अवघ्या काही क्षणात त्याला स्टंपिंग करत बाद केलं. आपण नाबाद आहोत असं क्लासेनला वाटलं, पण तिसऱ्या पंचांनी त्याला बाद घोषित केलं. त्यानंतर संजू सॅमसनला नूर अहमदने मिठी मारलेली असताना संजू क्लासेनकडे जळता कटाक्ष टाकत पाहत होता. तितक्यात त्याच्याजवळून जाणारा क्लासेन त्याला काहीतरी बोलताना दिसला. त्या दोन खेळाडूंमध्ये वाद सुरू झाला. खेळाडूंनी मध्यस्थी केली आणि क्लासेन पॅव्हेलियनकडे परत जाऊ लागला. मात्र, क्लासेन मागे वळून संजूला सातत्याने काहीतरी बोलताना दिसला.




# प्लेऑफचे ३ संघ ठरले! एका जागेसाठी पाच संघांमध्ये चुरशीची लढत

**महाईन्यूज । मुंबई**

**आयपीएल २०२६ प्लेऑफचं समीकरण आता रोमांचक वळणावर येऊन ठेपलं आहे. चेपॉकच्या मैदानावर खेळण्यात आलेल्या चेन्नई सुपर किंग्स आणि सनरायझर्स हैदराबाद संघांमधील सामन्यांनंतर प्लेऑफसाठी पात्र ठरलेल्या संघांचा आकडा तीनवर पोहोचला आहे. प्लेऑफचे ३ संघ ठरले असून आता एका जागेसाठी पाच संघांमध्ये चुरशीची लढत होणार आहे. त्यामुळे आगामी सामने फार महत्त्वाचे असतील. इतर संघांसाठी प्लेऑफचं समीकरण कसं असणार, जाणून घेऊया.**



रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हा संघ सर्वाधिक १८ गुणांसह यंदाच्या प्लेऑफसाठी पात्र ठरणारा पहिला संघ ठरला. आरसीबीच्या पाठोपाठ गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांनीही प्लेऑफमधील आपलं स्थान निश्चित केलं आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू सध्या १८ गुणांसह पहिल्या स्थानावर आहे. गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांचे सध्या समान १६ गुण आहेत, परंतु गुजरातचा नेट रन रेट किंचित चांगला असल्याने ते दुसऱ्या स्थानावर आहेत, तर हैदराबाद तिसऱ्या स्थानावर आहे. पंजाब अजूनही चौथ्या स्थानावर आहे, परंतु संघ तिथेच कायम राहून प्लेऑफसाठी पात्र ठरणार की घसरणार यावर सर्वांच्या नजरा आहेत.

दरम्यान, प्लेऑफच्या शर्यतीतून केवळ दोन संघ अधिकृतरित्या बाहेर पडले आहेत. मुंबई इंडियन्स नवव्या स्थानावर, तर लखनौ सुपर जायंट्स दहाव्या स्थानावर आहे. या दोन्ही संघांचे सामने अद्याप शिल्लक आहेत. आता एका जागेसाठी स्पर्धा करणाऱ्या पाच संघांमध्ये पंजाब किंग्स, राजस्थान रॉयल्स, चेन्नई सुपर किंग्स,



दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांचा समावेश आहे.

पंजाब, चेन्नई आणि दिल्ली यांचा प्रत्येकी एक सामना बाकी आहे. राजस्थान आणि कोलकाता यांचे प्रत्येकी दोन सामने बाकी आहेत. केकेआर सध्या ११ गुणांसह आठव्या स्थानावर आहे, पण ते अजून स्पर्धेतून बाहेर पडलेले नाहीत.

आज १९ मे रोजी आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्स आणि लखनौ सुपर जायंट्स आमने-सामने येणार आहेत. लखनौ स्पर्धेबाहेर झाल्याने राजस्थानसाठी हा एक महत्त्वाचा सामना असणार आहे. हा त्यांचा १३वा सामना असेल. राजस्थान सध्या १२ गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. विजय मिळाल्यास संघ थेट अव्वल चारमध्ये पोहोचेल, या विजयामुळे त्यांचं प्लेऑफमधील स्थान निश्चित होणार नसले तरी, त्यांच्या संधी निश्चितच बळकट होतील. तर एकेक सामने शिल्लक असणाऱ्या संघांना शर्यतीत टिकून राहण्यासाठी सामना मोठ्या फरकाने जिंकणं महत्त्वाचं असणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार ।
दि. 20 मे 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# महापालिका शाळांसाठी १.६२ लाख पुस्तकांचा साठा दाखल

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाने समग्र शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी मागवलेली १ लाख ६२ हजार पाठ्यपुस्तके शहरात दाखल झाली आहेत. बालभारती कडून पुस्तकांचा पुरवठा पूर्ण करण्यात आला असून, आकुर्डी व पिंपरी येथील उन्नत केंद्रांवर ही पुस्तके साठवण्यात आली आहेत.**

### पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हाती नवी पुस्तके

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांसाठी १.६२ लाख पाठ्यपुस्तकांचा पुरवठा पूर्ण झाला असून, १५ जूनपासून सुरू होणाऱ्या नव्या शैक्षणिक सत्राच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. समग्र शिक्षा अभियानांतर्गत होणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सुरुवातीपासूनच अभ्यासाची गती मिळणार असून, शिक्षण विभागाने वितरणाची सर्व तयारी पूर्ण केली आहे.

पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाने समग्र शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी मागवलेली १ लाख ६२ हजार पाठ्यपुस्तके शहरात दाखल झाली आहेत. बालभारती कडून पुस्तकांचा पुरवठा पूर्ण करण्यात आला असून, आकुर्डी व पिंपरी येथील उन्नत केंद्रांवर ही पुस्तके साठवण्यात आली आहेत.

१५ जूनपासून नवीन शैक्षणिक सत्र सुरू होणार असल्याने, पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातात नवी कोरी पुस्तके देण्याचे नियोजन शिक्षण विभागाने केले आहे. त्यानुसार शालेय साहित्य खरेदी व वितरणाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. समग्र शिक्षा अभियानांतर्गत दरवर्षी महापालिका, अनुदानित, विनाअनुदानित तसेच खासगी शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके दिली जातात. जूनच्या पहिल्या आठवड्यात शाळांच्या मागणीनुसार संबंधित केंद्रांवरून पुस्तकांचे गठ्ठे वितरित करण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांना वेळेत व संपूर्ण शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेचा शिक्षण विभाग सज्ज झाला असून, नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात सुरळीत करण्यावर भर देण्यात आला आहे.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY AKURDI PUNE
Think | Thrive | Transform
ADMISSION OPEN
A.Y. 2026

DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.
It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.

UG/PG Programs
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp




CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# सोसायटीवरील ‘ॲमिनेटीज्’ कर आकारणी रद्द करा!

## चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनची मागणी; आयुक्तांना निवेदन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून सोसायट्यांमधील ओपन पार्किंग, खुल्या जागा, खेळाची मैदाने, क्लब हाऊस तसेच इतर ‘ॲमिनेटीज्’वर मालमत्ता कर आकारण्यात आल्याने शहरातील सोसायटीधारकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या कर आकारणीचा तातडीने फेरविचार करून ती रद्द करण्यात यावी, अशी मागणी चिखली–मोशी–पिंपरी–चिंचवड सोसायटी फेडरेशनने केली आहे.**


चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशन
(नोंदणी क्रमांक : महा./१२३६/२०२१/दिनांक : ०१/१०/२०२१)
* अध्यक्ष *
श्री. संजीवन सांगळे
मो. ८९७५२८२३७७
पत्ता : गट नं.१११, जी.के. पॅलेसिओ सोसायटी, डी-६०४, बोऱ्हाडेवाडी, मोशी (पिंपरी-चिंचवड), पुणे - ४१२१०५.
Email ID : cmpcsocietyfederation@gmail.com

जावक क्र.: 341/2026 दिनांक : 19/05/2026

प्रति,
माननीय,आयुक्त,
पिंपरी चिंचवड मनपा
पिंपरी पुणे- 18

विषय- चालू आर्थिक वर्षापासून पिंपरी चिंचवड शहरातील सोसायट्यांना सोसायट्यामधील असणाऱ्या मोकळ्या जागेवर, खुल्या पार्किंगवर (ओपन पार्किंग ) हॉलीबॉल कोर्ट, खेळासाठीचे गार्डन यांच्यावर अमेनेट्रीज या नावाने चुकीच्या पद्धतीने लावलेला मालमत्ता कर रद्द करण्याबाबत..

माननीय महोदय,

वरील विषयानुसार आपणाला विनंती करण्यात येते की, चालू 2026 -27 या आर्थिक वर्षापासून पिंपरी चिंचवड शहरातील सोसायट्यांना आपल्या महानगरपालिकेकडून सोसायटीमध्ये असणाऱ्या ओपन पार्किंग, खुल्या जागा, खेळासाठीचे गार्डन, क्लब हाउस, हॉलीबॉल कोर्ट. अशा सर्व अमेनिटीज वर अतिशय चुकीच्या पद्धतीने कर आकारणी करण्यात आलेली आहे. सोसायटीमध्ये खुल्या असणाऱ्या जागेवर अशाप्रकारे कर आकारणी करणे अत्यंत चुकीचे आहे. महाराष्ट्रातील इतर कोणत्याही महानगरपालिकेमध्ये अशा पद्धतीने सोसायटीच्या ॲम्युनिटीज वर कर आकारणी केली जात नाही. तरी कृपया आपल्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडून परत फेर सर्वेक्षण करून ही केलेली कर आकारणी रद्द करावी ही विनंती

प्रत योग्य ते माहितीसाठी..

1) श्री सचिन पवार, उपायुक्त कर संकलन आणि कर आकारणी विभाग
पिंपरी चिंचवड मनपा पिंपरी पुणे 18

अध्यक्ष
चिखली-मोशी- पिंपरी चिंचवड



या संदर्भात फेडरेशनच्या वतीने महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सोसायटी परिसरातील खुल्या व सामायिक स्वरूपाच्या जागांवर अशा प्रकारे स्वतंत्र कर आकारणी करणे अन्यायकारक असून, यामुळे प्रामाणिक करदात्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.

फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी या निर्णयावर तीव्र आक्षेप नोंदवत सांगितले की, “सोसायटीधारक नियमितपणे मालमत्ता कर भरत असताना ओपन पार्किंग, गार्डन, खेळाची मैदाने आणि क्लब हाऊस यांसारख्या सुविधांवर वेगळा कर लादणे चुकीचे आहे. हा प्रकार तातडीने थांबवून लावलेला कर रद्द करावा, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.”

या मुद्द्यावर महानगरपालिकेकडून अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही. मात्र या कर आकारणीविरोधात सोसायटी फेडरेशनने एकत्रित भूमिका घेतल्याने शहरात या विषयावर मोठा वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

> “ पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून सोसायट्यांमधील ओपन पार्किंग, गार्डन, क्लब हाऊस आणि खेळाची मैदाने यांसारख्या सामायिक सुविधांवर स्वतंत्रपणे ‘ॲमिनेटीज्’ कर लादणे हे पूर्णपणे अन्यायकारक आहे. सोसायटीधारक आधीच नियमित मालमत्ता कर भरत असताना त्यांच्यावर अतिरिक्त भार टाकणे योग्य नाही. हा निर्णय तातडीने रद्द करून फेरविचार करण्यात यावा; अन्यथा नागरिकांच्या हितासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल.
>
> **- संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली–मोशी–पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.**




## मंगलाताई कदम यांची पक्षामधून हकालपट्टी करा; रवींद्र ओव्हाळ

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांच्याकडे पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी झोपडपट्टी सेलचे अध्यक्ष रवींद्र ओव्हाळ यांनी माजी महापौर मंगलाताई कदम यांची पक्षातून हकालपट्टी करावी अशी मागणी केली आहे.

सोमवारी मंगलाताई कदम यांचा एक कथित व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित झाला आहे. यामध्ये त्यांनी मागील काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षविरोधी काम केल्याची अप्रत्यक्षरीत्या कबुली दिली आहे. नुकत्याच झालेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीमध्ये त्यांनी त्यांच्या मुलाला भाजपाची उमेदवारी मिळवून देऊन जाहीरपणे प्रचार केला आहे. याची पक्षप्रमुख म्हणून सुनेत्रा अजितदादा पवार यांनी गंभीर दखल घेऊन मंगलाताई कदम यांच्यावर बडतर्फीची कारवाई करून त्यांची पक्षातून त्वरित हकालपट्टी करावी अशी मागणी या पत्रात करण्यात आली आहे.

या पत्रावर खजिनदार दीपक साकोरे, सेवादल शहराध्यक्ष ज्ञानेश्वर मोरे, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष संजय अवसरमल, पदवीधर सेल अध्यक्ष प्रदीप औटी आणि वाहतूक सेल अध्यक्ष विनोद वरखेडे यांनी देखील सह्या केल्या आहेत, तसे पत्र रवींद्र ओव्हाळ यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

## NEET पेपरफुटी प्रकरण; आरसीसीच्या फलकाची तोडफोड!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात नीट पेपरफुटी प्रकरणाचे पडसाद उमटू लागले असून, आरसीसी क्लासेसचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या आरसीसी फलकाची संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांकडून तोडफोड करण्यात आली. संभाजी ब्रिगेड पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.**




या वेळी संभाजी ब्रिगेडचे पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष सतिश काळे पुणे जिल्हा कार्याध्यक्ष भैय्यासाहेब गजधने ब्रह्मानंद जाधव,प्रसाद दौंडकर उपस्थित होते.

नीट -यूजी 2026 पेपरफुटी प्रकरणात आरसीसी क्लासेसचे संस्थापक प्रा. शिवराज मोटेगावकर यांना सीबीआयने अटक केल्यानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. मोटेगावकर हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध कोचिंग संस्थांपैकी एक असलेल्या आरसीसीचे प्रमुख आहेत. लातूर पॅटर्नमधील मोठे नाव म्हणून त्यांची ओळख होती. मात्र, पेपरफुटी प्रकरणात त्यांचे नाव समोर आल्यानंतर विद्यार्थ्यांसह पालकांमध्येही तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

याच पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी शहरातील आरसीसी संबंधित फलक फोडून निषेध नोंदवला. “विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना माफी नाही”,“शिक्षण क्षेत्रातील माफियांवर कठोर कारवाई करा” अशा घोषणा देण्यात आल्या. सतीश काळे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, लाखो विद्यार्थी प्रामाणिकपणे अभ्यास करून परीक्षा देतात. मात्र पैशांच्या जोरावर पेपरफुटी करून काही जण विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त करत आहेत. अशा प्रवृत्तींचा निषेध म्हणून हे आंदोलन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य सरकारकडेही या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. तसेच नीट सारख्या राष्ट्रीय परीक्षांमध्ये वारंवार होणाऱ्या गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांचा विश्वास ढासळत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करून शिक्षण क्षेत्र पारदर्शक करण्याची मागणी आंदोलकांनी केली.

दरम्यान, सीबीआय च्या तपासात आरसीसी संस्थेशी संबंधित काही महत्त्वाचे धागेदोरे समोर आल्याची चर्चा आहे. तपास यंत्रणांनी मोटेगावकर यांच्या निवासस्थानी व संस्थांमध्ये चौकशी केली असून, अनेक डिजिटल पुरावेही जप्त करण्यात आल्याचे वृत्त आहे.

# खेड शिवापूरमधील अनधिकृत होर्डिंगवर हातोडा!

## भूगाव-घोटवडे फाटा येथील अतिक्रमणे जमीनदोस्त; 'पीएमआरडीए'चे कारवाई सत्र सुरूच

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाने अनधिकृत होर्डिंग आणि रस्ते अतिक्रमणांविरोधात सुरू ठेवलेले धडक कारवाईचे सत्र आणखी तीव्र केले आहे. 'पीएमआरडीए'ने मंगळवारी (१९ मे) हवेली (पश्चिम) तालुक्यातील खेड शिवापूर येथील एका मोठ्या रुग्णालयाचे अनधिकृत होर्डिंग हटवले असून, भूगाव ते घोटवडे फाटादरम्यान रस्ते अतिक्रमणविरोधी संयुक्त मोहीम राबवून रस्त्यावरील अतिक्रमणे हटविली आहेत.**







हवेली तालुक्यातील मौजे खेड शिवापूर येथील गट क्रमांक ११४ मध्ये 'मॅक्स न्यूरो हॉस्पिटल'ने विनापरवानगी अनधिकृत होर्डिंग उभारले होते. हे होर्डिंग अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाच्या पथकाने पूर्णपणे निष्कासित केले. दरम्यान, 'पीएमआरडीए' आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांच्यावतीने मौजे भूगाव ते घोटवडे फाटा दरम्यान संयुक्त रस्ते अतिक्रमणविरोधी मोहीम राबवण्यात आली. या धडक कारवाईत रस्त्याला अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटवण्यात आली. त्यामध्ये रस्त्यालगत बेकायदेशीरपणे उभारलेली सहा पत्रा शेड पूर्णपणे हटवण्यात आली. तसेच, रस्त्याच्या जागेत आलेली दोन सीमाभिंतींची (कंपाउंड वॉल) बांधकामे तोडण्यात आली. वाहतुकीला अडथळा ठरणारे आणि विनापरवानगी लावलेले १० छोटे जाहिरात फलक जप्त करण्यात आले.

'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या आदेशानुसार आणि अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाचे सहआयुक्त (प्रभारी) हिंमत खराडे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार आशा होळकर, रवींद्र रांजणे आणि त्यांच्या पथकाने ही धडक मोहीम यशस्वीरीत्या पार पाडली. अतिक्रमणधारक आणि अनधिकृत होर्डिंगधारकांविरोधात यापुढेही सातत्याने अशीच कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे हिंमत खराडे यांनी स्पष्ट केले.



पुणे महानगर प्रदेश हद्दीत (पीएमआरडीए) कोणत्याही नागरिकाने किंवा व्यावसायिक संस्थेने अनधिकृतपणे होर्डिंग उभारू नयेत, अथवा रस्ते परिसरात अतिक्रमण करू नये. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढे अधिक कठोर कारवाई करण्यात येईल. 'पीएमआरडीए' हद्दीत होर्डिंग उभारण्यापूर्वी संबंधितांनी रितसर परवानगी घेणे बंधनकारक आहे. नागरिकांच्या सोयीसाठी ही परवानगी प्रक्रिया 'पीएमआरडीए' प्रशासनाने अधिक सुलभ केली आहे.

**- डॉ. अभिजीत चौधरी, महानगर आयुक्त, पीएमआरडीए.**

# अनधिकृत इंटरनेट व टीव्ही केबल्सविरोधात महापालिकेचा इशारा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावरील दिवाबत्तीच्या खांबांवर काही संस्था आणि व्यक्तींनी पूर्वपरवानगीशिवाय टीव्ही तसेच इंटरनेट केबल्स टाकल्याचे समोर आले आहे. या प्रकारामुळे सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण होत असल्याने महापालिकेने संबंधित केबल ऑपरेटर्स आणि इंटरनेट सेवा पुरवठादारांना ३० दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन केले आहे.**




महापालिकेच्या विद्युत विभागाने स्पष्ट केले की, महानगरपालिकेच्या खांबांवर केबल टाकण्यासाठी कोणालाही परवानगी देण्यात आलेली नाही. अनधिकृतपणे ओढण्यात आलेल्या केबल्समुळे दुर्घटना होण्याची शक्यता असून, विद्युत खांब व त्यावरील यंत्रणांचे नुकसान झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे सार्वजनिक सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

याशिवाय, शहराच्या सौंदर्यावरही या केबल्सचा विपरीत परिणाम होत असून, नागरिक, सामाजिक संस्था तसेच लोकप्रतिनिधींनी याबाबत महापालिकेकडे अनेक तक्रारी केल्या आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार, पूर्वपरवानगीशिवाय टाकण्यात आलेल्या केबल्सना महापालिकेच्या मालमत्तेवरील अतिक्रमण मानले जाणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

महापालिकेने स्पष्ट केले की, कोणतीही केबल टाकण्यासाठी प्रथम परवाना विभागाकडून रितसर परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच परवाना मिळाल्यानंतर पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीद्वारे उभारण्यात आलेल्या ऑप्टिकल फायबर केबल (OFC) नेटवर्कचा वापर करणे किंवा त्या डक्टमधून केबल टाकणे आवश्यक राहील.



सर्व संबंधित केबल ऑपरेटर्स आणि इंटरनेट सेवा पुरवठादारांनी वैध परवाना, जीएसटी किंवा एमएसएमई प्रमाणपत्र, कार्यालयाचा पत्ता व शॉप ॲक्ट परवाना, केवायसी कागदपत्रे, हमीपत्र, केबल मार्गाचा तपशील, शुल्क भरल्याच्या पावत्या आणि महापालिकेच्या परवान्याच्या प्रती यांसह सर्व आवश्यक कागदपत्रे ३० दिवसांच्या आत महापालिकेच्या विद्युत विभागात सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

निर्धारित मुदतीत माहिती व कागदपत्रे सादर न करणाऱ्या ऑपरेटर्सविरोधात महापालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. तसेच अशा कारवाईमुळे नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीसाठी संबंधित केबल ऑपरेटर्स जबाबदार राहतील, असेही महापालिकेने स्पष्ट केले आहे.

# हवेली ग्रामीणमधील 13 गावे शहर नगर भूमापन कार्यालयाशी जोडणार!

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मान्यता; आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील बोपखेल, दिघी, वडमुखवाडी, चऱ्होली, चोवीसावाडी, डुडुळगाव, मोशी, चिखली, देहू, किन्हई, रावेत, मामुर्डी आणि किवळे या गावांना नगर भूमापन कार्यालय, पिंपरी-चिंचवड यांच्याशी संलग्न करण्यास महसूल विभागाने मान्यता दिली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यास मंजुरी दिल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.**




यापूर्वी ही गावे हवेली ग्रामीण भूमी अभिलेख कार्यालयाशी संलग्न असल्यामुळे जमीन मोजणी, प्रॉपर्टी कार्ड तसेच विविध अभिलेख कामांसाठी नागरिकांना वारंवार हवेली कार्यालयात जावे लागत होते. त्यामुळे वेळ आणि पैशांचा मोठा अपव्यय होत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात होती.

भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी या संदर्भात महसूल मंत्री बावनकुळे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. 18 मार्च 2025 रोजी दिलेल्या निवेदनात त्यांनी संबंधित गावे नगर भूमापन कार्यालय, पिंपरी-चिंचवड यांच्याशी संलग्न करण्याची मागणी केली होती. या प्रस्तावावर मंत्रीस्तरावर स्वाक्षरी झाल्याचे सांगण्यात येत असून, अधिकृत आदेश लवकरच जारी होण्याची शक्यता आहे.

या निर्णयामुळे संबंधित गावांतील नागरिकांना जमीन मोजणी, प्रॉपर्टी कार्ड, अभिलेख दुरुस्ती आदी सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत. परिणामी शासकीय कामकाज अधिक सुलभ होऊन नागरिकांची पायपीट थांबणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

दरम्यान, या निर्णयाबद्दल आमदार महेश लांडगे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले असून, “पिंपरी-चिंचवडकरांच्या हितासाठी सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे,” अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.



“पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना जमीन मोजणी, प्रॉपर्टी कार्ड आणि भूमी अभिलेखाच्या कामांसाठी हवेली कार्यालयात जावे लागत होते. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. आता संबंधित गावे नगर भूमापन कार्यालय, पिंपरी-चिंचवड यांच्याशी संलग्न करण्याचा निर्णय झाल्याने नागरिकांची पायपीट थांबणार असून वेळ आणि पैशांची बचत होणार आहे. सर्व शासकीय सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय ठरणार आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

**- महेश लांडगे, आमदार, भाजपा.**

